दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • रविवार दि.२५ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १५२ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Sunday 25 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 152 • Pages 4 • Rate 4 Rs




# आम्हाला कुणाच्याही प्रस्तावाची गरज नाही मुंबईत महायुतीचाच महापौर होईल

## शिंदेंनी फेटाळला ठाकरेंच्या भास्कर जाधवांचा प्रस्ताव

**शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी सत्ताधारी शिवसेनेचे सर्वेसर्वा एकनाथ शिंदे यांना मुंबईच्या महापौरपदासाठी ठाकरे गटाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. या प्रकरणी राजकीय वर्तुळात उलटसुलट प्रतिक्रिया येत असताना आता स्वतः एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणावरील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोणता प्रस्ताव? काय प्रस्ताव? आम्हाला कुणाच्याही प्रस्तावाची गरज नाही. मुंबईत शिवसेना - भाजप महायुतीचाच महापौर होत आहे, असे ते म्हणालेत.आजपासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. या ऐतिहासिक वर्षात मुंबई महापालिकेवर भगवा फडकवावा व शिवसेनेचाच महापौर व्हावा अशी आग्रही मागणी शिवसैनिकांकडून व्यक्त केली जात आहे. पण भाजपने ८९ जागांसह महापौर पदावर आपला हक्क सांगितल्यामुळे पेच निर्माण झाला आहे. त्यातच ठाकरे गटाचे नेते भास्कर जाधव यांनी एकनाथ शिंदे यांना मुंबई महापालिकेत ठाकरेंच्या महापौरपदाच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदेंनी वरील भूमिका व्यक्त केली आहे.**



**मुंबई । प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे यांनी आज बाळासाहेबांना अभिवादन केले. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते म्हणाले, कोणता प्रस्ताव, काय प्रस्ताव? आम्हाला कुणाच्याही प्रस्तावाची गरज नाही. मुंबईत शिवसेना - भाजप महायुतीचा महापौर होत आहे. भाजप व शिवसेना ही आताची युती नाही. ती बाळासाहेब, अटलजी व अडवाणींच्या काळातील युती आहे. एनडीएमध्ये आम्ही सोबत आहोत. महायुतीमध्ये सोबत आहोत. त्यामुळे विचारधारेबरोबर आम्ही आहोत.ते पुढे म्हणाले, मुंबईत महायुतीचाच महापौर बसेल. आमची युती आहे. त्यांच्यासारखी याला खड्ड्यात घाल, त्याला खड्ड्यात घाल अशी युती नाही. खुर्ची व सत्ता हा आमचा अजेंडा नाही. आम्ही मुंबईकरांना काय देणार हे आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. कारण, मुंबईकरांनी आमच्यावर विश्वास टाकला आहे. आता या ५ वर्षांत आम्ही मुंबई जागतिक पातळीवरील शहरासारखी करणार. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुंबईला फिनटेक कॅपिटल करण्याचा शब्द दिला आहे. त्यानुसार, मुंबई हे जागतिक आर्थिक केंद्र झाले पाहिजे.

पण विरोधकांनी लगेचच मुंबईला तोडण्यात येणार असल्याची ओरड करण्यात आली. पण मराठी माणूस तुमच्यामुळे मुंबईबाहेर फेकला गेला. मुंबईकरांना जीवनात काय मिळणार हा आमचा अजेंडा आहे. आता मनसेही आमच्यासोबत येत आहे. मनसेने विकासाच्या मुद्यावर आम्हाला साथ दिली. आमच्यात महापौरपदासाठी कोणतीही रस्सीखेच नाही. बहुमत नसणाऱ्यांनी स्वप्ने पाहणे चुकीचे आहे, असे शिंदे म्हणाले.

या योजनेसाठी सरकार मोठ्या प्रमाणात निधी देईल. सरकारने महिला बचत गट सक्षम करण्यासाठीही मोठी तरतूद केली आहे. मराठी भाषेसाठी १०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. पुढील आठवड्यापासून प्लास्टिक मुक्त गडकिल्ले अभियान सुरू होईल, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

### मोदींनी बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण केले

महापालिका निवडणुकीत शिवसेना भाजपनंतर दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरली आहे. चांदा ते बांदा शिवसेना घराघरात पोहोचली आहे.

एनडीएमध्ये नेहमीच शिवसेनेला सन्मान मिळाला. अयोध्येत राम मंदिर उभारणे व जम्मू काश्मीरमधील कलम ३७० रद्द करणे हे बाळासाहेबांचे स्वप्न होते. पंतप्रधान मोदींनी त्यांची ही दोन्ही स्वप्ने पूर्ण केली आहेत. शिवसेना सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. बाळासाहेब ठाकरे हे कार्यकर्त्यांना मोठे करणारे नेते होते. त्यामुळे सरकारने आरोग्य आपल्या दारी अभियान राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना सरकार आपल्या दारी योजनेच्या धर्तीवर राबवली जाईल.

## आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या हस्ते ग्राम पंचायत कोल्हेवाडी येथील पिठाच्या गिरणीचे उद्घाटन संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात विविध उपक्रमात अग्रेसर असणारी ग्रामपंचायत म्हणून कोल्हेवाडी ग्राम पंचायत कार्यालयाच्या वतीने तालुक्यात नाविन्य पूर्ण उपक्रमांतर्गत गावातील कुटुंबांना ग्रामपंचायतची माफक अशा दरात धान्य दळण्याची सुविधा सुलभ व जलद व्हावी व प्रत्येक कुटुंबाने आपला ग्राम पंचायतचा कर वेळेवर भरून नाविन्यपूर्ण अशा सुविधेचा लाभ घ्यावा.या उद्देशाने ग्रामपंचायतने या पिठाच्या गिरणीची उभारणी केली आहे. आदर्श ग्रामपंचायत पाटोदा (छत्रपती संभाजी नगर ) येथील माजी सरपंच भास्कर पेरे यांच्या ग्रामपंचायतीच्या धर्तीवर कोल्हेवाडी ग्रामपंचायतने या गिरणीची उभारणी केली आहे.या पिठाच्या गिरणीचे उद्घाटन आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या शुभहस्ते शुक्रवार दि.२३ जानेवारी रोजी मोठ्या



उत्साहात पार पडले.भास्करराव पेरे पाटील यांनी उद्घाटन प्रसंगी बोलताना सांगितले की, छोट्या ग्रामपंचायत ला अनुदान कमी असते, कुटुंबांनी ग्रामपंचायतचा वेळेवर कर भरून नाविन्य पूर्ण अशा योजनेचा लाभ घेतला पाहिजे.गावामध्ये पाणी अडवले पाहिजे, प्रत्येक महिलां-पुरुषांनी एक झाड लावले पाहिजे. गावामध्ये स्वच्छता अभियान राबवले पाहिजे. गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करा.म्हाताऱ्या कोताऱ्या लोकांना संभाळा! त्यांना जीव लावा असे तेम्हणाले

या पिठाच्या गिरणीमुळे कोल्हेवाडी गावातील शेतकरी,महिला व सर्व सामान्य नागरिकांनामोठा दिलासा मिळणार असून गावाच्या स्वावलंबनाच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून श्री. राठोड साहेब (सहाय्यक गट विकास अधिकारी, पंचायत समिती केज),श्री. रोडेवार साहेब (विस्तार अधिकारी,पंचायतसमिती केज) तसेच श्री.महेंद्र धाकपाडे ( ग्रामपंचायत अधिकारी) सरपंच, ग्रामसेवक उपसरपंच सदस्य,शिक्षक कर्मचारी वृंद,व पंचक्रोशीतील महिला भगिनी व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाला वेळात वेळ काढून उपस्थित राहिल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आलेल्या सर्व मान्यवरांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

## मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी ६५ हजारांची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

### तलाव ठेका रद्द करण्याची भीती दाखवून मागितली होती सव्वा दोन लाखांची लाच

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

मत्स्यव्यवसाय ठेका रद्द न करण्यासाठी आणि जुन्या मंजुरीच्या बदल्यात लाचेची मागणी करणाऱ्या मत्स्यव्यवसाय विकास अधिकाऱ्याला आज लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. किरण गणेश पाडवी (वय ५४) असे अटक करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव असून, ते मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी (वर्ग २) तथा प्रभारी सहायक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत.तक्रारदार यांच्या संस्थेला नवापूर तालुक्यातील रंगावली तलाव (उंबर्डी) येथील मासेमारीचा ठेका सन २०२५ ते २०३० या पाच वर्षांच्या कालावधीसाठी मंजूर करण्यात आला होता. या मंजुरीचा आदेश देण्यासाठी आरोपी किरण पाडवी यांनी सुरुवातीला १ लाख रुपयांच्या 'बक्षीसाची' मागणी केली होती. मात्र, तक्रारदाराने ती रक्कम दिली नव्हती.

त्यानंतर, ९ जानेवारी २०२६ रोजी पाडवी यांनी तक्रारदाराला कार्यालयात बोलावून तलावात मासे टाकले नाहीत असे कारण सांगून ठेका रद्द करण्याची व तो दुसऱ्याला देण्याची धमकी दिली. हा ठेका रद्द न करण्यासाठी पाडवी यांनी २ लाख ६५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली.तक्रारदाराने या प्रकाराबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार नोंदवली होती. आज, २३ जानेवारी रोजी एसीबीने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे २ लाख रुपये एका त्रयस्थ व्यक्तीच्या बँक खात्यात ट्रान्सफर करण्यास सांगून, उर्वरित ६५,००० रुपये रोख स्वीकारताना किरण पाडवी यांना त्यांच्याच कार्यालयात रंगेहाथ पकडण्यात आले.ही कारवाई नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी व सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पथकात पोलीस उपअधीक्षक प्रशांत भरते, पोलीस निरीक्षक विकास लोंढे आणि कर्मचारी विलास पाटील, देवराम गावीत, विजय ठाकरे, हेमंतकुमार महाले, नरेंद्र पाटील, जितेंद्र महाले, संदीप खंडारे व सुभाष पावरा यांचा समावेश होता.

## वादळी कट्टा

फलकावर स्वच्छतेचे मोठे मोठे नारे,
पायवाटेवर कचऱ्याचेच वाढलेले डोंगर सारे.
फोटोसाठी झाडू फिरतो क्षणिक शोभेचा खेळ,
कॅमेरा जाताच पुन्हा कचऱ्याचाच मेळ.

स्वच्छ शहराचे स्वप्न भाषणात रंगते भारी,
गल्लीबोळात दुर्गंधीचीच उघडी तयारी.
नियम कागदापुरते, अंमलबजावणी थंड,
जबाबदारी सगळ्यांची पण पुढे कोणीच मंद.

बॅनर रोज बदलतात, आशय मात्र जुना,
कचऱ्यावरच उभा राहतो स्वच्छतेचा बुजरा.
योजना येतात-जातात, घोषणा गगनभेदी,
कृतीशिवाय स्वच्छतेची फसवणूकच बेदी.

घराघरात स्वच्छतेची चर्चा होते फार,
दाराबाहेर टाकताना हरवतो तोच विचार.
स्वच्छतेचा मंत्र सगळ्यांना तोंडपाठ असतो,
अंमलाची वेळ आली की गावच ओस पडतो.

संपादक
अजय भांगे



## गुन्हेगारांचे कर्दनकाळ ठरलेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना पत्रकार संघाचा महाराष्ट्राचे राजरत्न हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गुन्हेगारांचे खऱ्या अर्थाने कर्दनकाळ ठरलेले पहिले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने महाराष्ट्राचे राजरत्न - २०२६ हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पोलीस प्रशासनामध्ये सन २०१७ मध्ये देशसेवेचे स्वप्न उराशी घेऊन नवनीत कॉवत हे लोणावळा येथे एसडीपीओ म्हणून रुजू झाले. मेहनत आणि संघर्ष यावर ते धाराशिवचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक झाले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथे पोलीस उपायुक्त म्हणून त्यांनी कार्य केले. बीड जिल्हा संवेदनशील टप्प्यावर असताना २१ डिसेंबर २०२४ पासून त्यांनी पोलीस अधीक्षक



पदाचा पदभार स्वीकारला. अवघ्या एक वर्षाच्या कालावधीत त्यांनी बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडीत काढली असून बीड जिल्ह्यातील जातीय द्वेष आणि अशांतता दूर करत पुन्हा एकदा बीड जिल्ह्यामध्ये सामाजिक सलोखा उभा करण्याचे अवघड काम त्यांनी लिलयारित्या पार पाडले आहे. आई शिक्षिका आणि वडील भारतीय रेल्वेतून सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्या आदर्श विचारांवर त्यांनी सुरू केलेले प्रशासकीय कामकाज उल्लेखनीय आणि प्रशसनीय आहे. याकरिताच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने महाराष्ट्राचे राजरत्न - २०२६ हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याचे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांच्या वतीने जाहीर करण्यात आले आहे. सन्मानाचा हा राज्यस्तरीय पत्रकार संघाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल पोलीस प्रशासनासह बीड जिल्हा प्रशासन आणि सर्व स्तरातून पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचे अभिनंदन होत आहे.

# संपादकीय

## ऐका निसर्गाच्या हाका

नेमेचि येतो पावसाळा' हे वचन आता इतिहासात राहिले आहे. सध्या पाऊस भारतीय उपखंडात आणि दक्षिण भारतात वाढत चालला आहे आणि त्याचबरोबर त्याच्या साथीने येणारी चक्रीवादळे, जमिनीचे खच्चीकरण आणि धूप थांबणे आणि हिमस्खलन वगैरे प्रकार नित्यनेमाने घडत असतात. आता 'दितवाह' हे चक्रीवादळ येऊ घातले आहे आणि दक्षिण भारतात म्हणजे तामिळनाडू आणि पुद्दुचेरी आदी राज्यांत या वादळाचे परिणाम दिसू लागले आहेत. त्यामुळे या भागात तुफानी पाऊस आणि झाडांची पडझड वगैरे वगैरे दिसून आले. पण या 'दिटवाह'बरोबरच केवळ तामिळनाडूच नव्हे तर इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया आणि श्रीलंका या देशांत जबरदस्त तबाही माजली आहे आणि श्रीलंकेत तर कित्येकजण या आपत्तीत बेपत्ता झाले आहेत. उष्ण कटिबंधीय प्रदेशात या वादळांमुळे पूरपरिस्थिती ओढवली आहे आणि इंडोनेशिया, मलेशिया, थायलंड आणि श्रीलंकेत अक्षरशः हाहाकार माजला आहे. 'दिटवाह'मुळे प्रचंड पाऊस, पूर आणि भूस्खलन अशी संकटे आली आहेत, तसेच त्याचे मुख्य कारण बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र हेच आहे. या वादळाला वातावरणीय अनुकूल परिस्थितीमुळे तीव्र चक्रीवादळात त्याचे रूपांतर झाले. सामान्यपणे असे सांगता येईल, की या चक्रीवादळाला कारण झाले ते बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र आणि त्यासाठी कारण होते ते समुद्राच्या पृष्ठभागावरील उष्णता आणि वातावरणातील दमटपणा. पण सर्वात भीषण परिणाम लंकेवर झाला आणि हे वादळ श्रीलंकेच्या किनाऱ्यावर आदळले आणि तेथे अतोनात मनुष्यहानी झाली आणि त्या गरीब देशाला त्याचे नुकसान सोसावे लागले.

या चक्रीवादळामुळे तामिळनाडूत फारशी हानी झाली नसली आणि लोक वेळीच सुरक्षित ठिकाणी गेल्याने वाचले आहेत. पण श्रीलंकेतील लोक मात्र तितके सुदैवी ठरले नाहीत आणि परिणामी तेथे १५० लोक बळी गेले, तर १५००० घरे उद्ध्वस्त झाली आहेत. त्याचसोबत रस्ते आणि दळणवळणाच्या सुविधांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. संपूर्ण श्रीलंका या वादळात उद्ध्वस्त झाली आहे आणि १०० हून अधिक लोकांचा यात मृत्यू झाला असल्याचे सागण्यात येते, तर कित्येक लोक कोलंबो आंतरराष्ट्रीय विमानतळावर अडकले आहेत. यावरून या घटनेचे गांभीर्य लक्षात यावे. श्रीलंकेतील चक्रीवादळामुळे हाहाकार माजला असून भारतालाही याचा धोका निर्माण झाला आहे. हवाई सेवा ठप्प झाली असून तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांना प्रवाशांना भारतात सुखरूप परत आणण्याचे आश्वासन द्यावे लागले. समुद्र शांत असतो तेव्हा तो चांगलाच शांत असतो. पण त्याच्या पोटात काय दडले आहे ते कुणीच सांगू शकत नाही, हेच 'दितवाह'ने सांगून टाकले आहे. दोन दिवसांपूर्वी हे संकट घोंघावत होते आणि आता त्याने चक्रीवादळाचे अक्राळविक्राळ रूप घेतले आहे. त्याबरोबर संपूर्ण श्रीलंका आणि तामिळनाडू यांना आपल्या कवेत घेतले आहे. साहजिकच माणूस नावाचा प्राणी त्यात सापडला नसता तरच नवल. लंकेबरोबरच भारतावर ही विनाशाची सावली पडली आहे. श्रीलंकेत झालेला पावसाचा प्रलय भारताकडे सरकत आहे आणि पुढील १२ तासांत ते आणखी सक्षम होणार आहे. याचा अर्थ भारताला आता चक्रीवादळाच्या संकटाला सामारे जावे लागणार आहे. आधी सेन्यार चक्रीवादळ आले आणि त्यात इंडोनेशियात तीनशेहून अधिक लोकांचा मृत्यू झाला. आता श्रीलंकेत हजारो लोक बळी पडण्याची शक्यता आहे. 'दितवाह' आणि 'सेन्यार'मुळे इंडोनेशिया आणि श्रीलंकेत जी तबाही माजली आहे त्यामुळे उष्णकंटिबंधीय चक्रीवादळाचे परिणाम लगेच लक्षात येतात. मुसळधार पाऊस, आंतरराष्ट्रीय नौवहन विकस्ळीत होणे आणि जहाजे नष्ट होणे असे प्रकार मोठ्या प्रमाणात होतात. हवामानातील बदल हा लाखो लोकांचा जिव्हाळ्याचा विषय आहे. दोन वर्षांपूर्वी हवामान परिषद भरली होती आणि त्यावेळी भारताने आश्वासन दिले होते, की हवामानातील बदलावर भारत आपला वाटा उचलेल. पण अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प यांनी आपले आश्वासन पाळले नाही आणि ऐनवेळी त्यातून माघार घेतली. परिणामी हवामानातील बदल हा विषय आजही धनाढ्य लोकांसाठी फारसा महत्त्वाचा नाही पण भारतासारख्या देशातील लोकांसाठी तो जिव्हाळ्याचा आणि जीवनमरणाचा राहिला आहे. भारतातील बहुतेक लोक आज समुद्राच्या काठी वास्तव्य करतात आणि त्यांच्यासाठी हवामान बदल हा जिव्हाळ्याचा विषय आहे.'दितवाह'सोबत तामिळनाडूत प्रचंड नुकसान होण्याची आशंका व्यक्त केली जात आहे आणि ते कधीही तामिळनाडूच्या किनाऱ्यावर आदळू शकते. तटीय आंध्र प्रदेश आणि रायलसीमा यनम आदी भागात जबरदस्त पावसाची अपेक्षा आहे. भारतात आता वादळांची पूर्वसूचना देण्याचे प्रकार पुरेसे आगाऊच कळत असल्यामुळे लोकांना त्या प्रदेशात जाऊ नका असा सल्ला देण्यात आला आहे, तसेच मच्छीमारांना सावधगिरीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्रावर या चक्रीवादळाचा फारसा परिणाम होणार नाही. त्यातल्या त्यात ही सुखद बातमी आहे. केवळ गडचिरोली जिल्ह्यात हलका पाऊस होईल. श्रीलंकेला भारताने मदत पाठवली आहे आणि त्यात मोदींनी मानवतेचे दर्शन घडवले आहे. पण भारतीय हवामान खात्याने तीन राज्यांना अलर्ट जारी केला आहे. उपाय कितीही केले गेले असले तरीही वारंवार चक्रीवादळे येण्यामागे हवामान बदल आणि मानवी हस्तक्षेप हीच प्रमुख कारणे आहेत. त्याशिवाय अनियोजित शहरी विकास आणि खारफुटीच्या जंगलांचा विनाश ही कारणे यामागे आहेत. या कारणांचा विचार केला जाऊन त्यावर उपाययोजना केली गेली तरच लाखो भारतीय लोकांचा जीव वाचेल. समुद्राचे तापमान वाढल्यानेही चक्रीवादळे येतात हे समोर आले आहे. हवामान सर्वत्रच अस्थिर झाले आहे आणि पावसाळा यंदा कधी नव्हे तो लांबला आहे. त्यात आता चक्रीवादळाचे संकट आले आहे, त्यामुळे लोक आणि शेतकरी त्यांची पाळीव जनावरे सर्वांचे प्राण संकटात आहेत. त्याला उपाय म्हणजे आपली विकासाची लालसा थांबवली पाहिजे आणि निसर्गाचा आदर केला पाहिजे. तसे झाले तरच आपण भविष्यात सुरक्षितपणे जगू शकू. हे चक्रीवादळ उतरताना डावीकडे सरकत असून याचा परिणाम तेथेही जाणवतो. ही चक्रीवादळे अत्यंत विनाशकारी आणि प्राणघातक असू शकतात आणि वेळेवर खबरदारी घेतल्यास लेकांना जीवही वाचवता येतो. दिटवाह हे चक्रीवादळ विनाशकारी आहे. श्रीलंकेत विनाशही घडविला आहे. पण तामिळनाडूला त्याचा फारसा परिणाम जाणवलेला नाही.

# रेल्वे भुसंपादन, रखडलेले कामे वेळेत पुर्ण करा-खा.बजरंग सोनवणे

## रेल्वे अधिकाऱ्यांना सुचना: अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचा घेतला आढावा, अपूर्ण कामे, भूसंपादन व नागरिकांच्या अडचणींवर सखोल चर्चा

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्गांवरील बीडपासून पुढे रखडलेले रेल्वे मार्गाचे कामे, भुसंपादनाची २० प्रकरणे वेळेत पुर्ण करा, रेल्वे मार्गाशेजारील शेतकऱ्यांच्या समस्या तातडीने सोडवा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात मंगळवारी (दि.२४) बीड रेल्वे विभागाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गासह विविध महत्त्वाच्या रेल्वे प्रकल्पांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अहिल्यानगर रेल्वे विभागाचे मुख्य अभियंता लोळगे, याच बरोबर विविध विभागाचे विभागप्रमूख उपस्थित होते. अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्गावरील विद्युत जोडणी, सिग्नल वर्क आणि बीड ते वडवणी तसेच वडवणी ते सिरसाळा व सिरसाळा ते परळी या टप्प्यांतील कामांची सद्यस्थितीबाबत सविस्तर आढावा घेतला. बीड ते परळी रेल्वेमार्गात २० ठिकाणची भुसंपादन प्रक्रिया सुरू आहे. सदरील प्रकिया तातडीने पुर्ण करा, या कामात हयगय करू नका, अशा सुचना देतानाच रेल्वेचे कंत्राटदार कामे करत नसतील तर त्यांना समज द्या, कामे वेळेत करून घेण्यासाठी प्रयत्न करा पण या वर्षात रेल्वे परळीपर्यंत हायस्पिड धावलीच पाहिजे, अशा सुचनाही यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या. रेल्वे हा बीडकरांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, शिवाय माझ्यासाठी हा विषय महत्वाचा आहे. यामुळे रेल्वेचे काम पुर्ण करण्यासाठी रात्रंदिवस काम सुरू ठेवा, असेही खा.सोनवणे म्हणाले.



**मालधक्का तातडीने कार्यन्वीत करा**

आष्टी तालुक्यात नियोजीत मालधक्का असून तो अद्याप प्रत्यक्षात सुरू झाला नाही. व्यपाारी, शेतकरी, उद्योजकांच्या दृष्टीने हा मालधक्का अत्यंत महत्वाचा आहे. तो तातडीने सुरू करावा, शिवाय बीड आणि परळीतही मालधक्के करावे लागणार आहेत. त्यासाठी रेल्वे प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी, अशा सुचना देखील खा.सोनवणे यांनी दिल्या.

**या महत्वाच्या मागण्यावर चर्चा**

बीड-नगर-मुंबई व बीड-नगर-पुणे इंटरसिटी सेवा चालू करणे, बाशी नाका येथे अतिरिक्त रेल्वे थांबा देणे, बीडमधील पालवन व बाशी नाका स्थानकासाठी कार पार्किंग, सर्व प्रमुख स्थानकांना लागणारी वीज उपलब्ध करणे, सोलार ऊर्जा निर्मिती प्रकल्प तयार करणे, आष्टीतील काकडवाडी (पिंपळा) लगतच्या रेल्वे क्रॉसिंग पुलाकरिता वाढीव निधी देणे अशा विविध महत्वाच्या मागण्यावर चर्चा करण्यात आली.

**अभियंत्याबद्दल नाराजी**

नगर-बीड-परळी रेल्वे मार्गातील शिरूर येथील रेल्वे पटरी खाली नाल्यावर तिरका पूल बांधल्यामुळे विकासनगर वस्तीवर जाण्या-येण्यासाठी असणारा दळणवळणाचा रस्ता बंद झाला आहे, असे म्हणत खा.बजरंग सोनवणे यांनी रेल्वेचे अभियंते असे कसे काम करत आहेत, अनेक ठिकाणी तिरके पुल बांधले, सरकारचा निधी विनाकारण खर्च केला असे म्हणत नाराजीही व्यक्त केली.

**परळी, नवीन रेल्वे मार्गावर चर्चा**

परळी-परभणी दुहेरीकरणासाठी होत असलेले जमीन अधिग्रहण व असलेली घरे रेल्वेसाठी संपादित न करता परळी थर्मल परिसरात मोकळी जागा शोधावी, असा पर्याय खा.सोनवणे यांनी शोधला, तर धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर नवीन रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण कामाच्या स्थितीबाबत सविस्तर चर्चा करू प्रकल्प फिजिबल होईल यासाठी प्रयत्न करावेत, असेही अधिकाऱ्यांना म्हटले.

**बैठकीला शेतकऱ्यांचीही उपस्थिती**

रेल्वे मार्गावरील हिवरसिंगा, मलकाचीवाडी-रोकडेश्वरनगर, खोकरमोहा, बरगवाडी-घुगेवाडी, शिरापूर धुमाळ येथील रेल्वेच्या पुलाजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. तर काही ठिकाणी ज्या गावचे शेत रेल्वेत गेले त्या गावचे नाव रेल्वे स्थानकाला न देता दुसरेच दिले, अशा तक्रारी घेवून शेतकरी, नागरिक बैठकीत दाखल झाले होते.

**रायमोहचा विषय पुन्हा सांगायला लावू नका**

पाटोदा रस्ता ते रेल्वे स्टेशन रायमोहा पक्का रस्ता करणे आवश्यक आहे. यासाठी दोन वेळा आपल्याला सांगितले आहे. त्याठिकाणी नागरिकांची गैरसोय होत आहे.पाटोदा रस्ता ते बाबासाहेब जाधव यांचे वस्तीकडे जाणारा रस्ता खोदकाम करून सोडलेला आहे. मदन जाधव हा विषय वारंवार मांडत असतात. त्याठिकाणी तातडीने काम करावे, हे काम पुन्हा सांगायला लावू नका, अशी तंबी देखील खा.बजरंग सोनवणे यांनी अधिकाऱ्यांना दिली.

**ओव्हरब्रीजची शेतकऱ्यांची मागणी**

आष्टी तालुक्यातील सोलापूरवाडी, कडा तसेच पाटोदा तालुक्यातील कारेगाव, शिरूर तालुक्यातील गोमळवाडा, विघनवाडी, हिवरसिंगा व बीड तालुक्यामध्ये नवगण राजुरी, चऱ्हाटा, धानोरा रोड या सर्व ठिकाणी रोड ओव्हर ब्रिज बांधण्याची आवश्यकता आहे, अशा मागण्या शेतकऱ्यांच्या आहेत. तसे निवेदने येतात, असे खा.सोनवणे म्हणाले.

# सौर तंत्रज्ञानातून समृद्धीकडे! नंदुरबारमध्ये 'सोलर अन्नप्रक्रिया' प्रशिक्षणाद्वारे स्वयंरोजगाराची नवी पहाट

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार | दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील दुर्गम भागातील महिला, युवक आणि शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आता 'सौर ऊर्जेचा' आधार लाभणार आहे. कृषी विज्ञान केंद्र, नंदुरबार आणि विज्ञान आश्रम, पाबळ (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने २२ व २३ जानेवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'सोलर आधारित अन्नप्रक्रिया' प्रशिक्षणाने ग्रामीण उद्योजगतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि 'आत्मा'चे प्रकल्प संचालक दीपक पटेल यांनी उद्घाटन प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन केले. ग्रामीण भागात नैसर्गिक संसाधनांची कमतरता नाही, गरज आहे ती आधुनिक तंत्रज्ञानाची. सोलर तंत्रज्ञानामुळे अतिशय कमी खर्चात घरगुती उद्योग उभारणे शक्य असून, महिला व युवकांनी या संधीचे सोने करावे, असे आवाहन त्यांनी केले.कृषी उपसंचालक तानाजी खर्डे यांनी सोलर ड्रायरच्या तांत्रिक फायद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, पारंपारिक पद्धतीने शेतमाल सुकवताना त्याची गुणवत्ता खालावते. मात्र, सोलर ड्रायरमुळे पदार्थाचा दर्जा सुधारतो, साठवणूक क्षमता वाढते आणि परिणामी शेतकऱ्यांना बाजारपेठेत अधिक भाव मिळतो. दोन दिवसीय सत्रात तज्ज्ञांनी विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन केले त्यामध्ये सोलर ड्रायरची रचना, विविध प्रकार आणि त्याची कार्यपद्धती. आंबा, टोमॅटो, मिरची व विविध भाज्या शास्त्रीय पद्धतीने सुकवून त्यांची मूल्यवृद्धी करणे.उत्पादन खर्च, नफा-तोटा, आकर्षक पॅकेजिंग, लेबलिंग आणि विक्री व्यवस्थापन. या प्रशिक्षणात धडगाव, अक्कलकुवा, नवापूर, तळोदा व शहादा अशा पाचही तालुक्यातील बचत गटांचे प्रतिनिधी आणि तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विज्ञान आश्रमाचे डॉ. रणजीत श्यामबाग व त्यांच्या टीमने प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखवल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांमध्ये मोठा आत्मविश्वास पाहायला मिळाला.नंदुरबार जिल्ह्याच्या उष्ण हवामानाचा विचार करता, हे सोलर तंत्रज्ञान इथल्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. या उपक्रमामुळे जिल्ह्यात केवळ पर्यावरणपूरक उद्योगच वाढणार नाहीत, तर स्थानिक पातळीवर रोजगाराच्या शाश्वत संधी उपलब्ध होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.




# अंधेरीत अनधिकृत बांधकामे हटवून वाहतुकीला मोकळा श्वास

## नागरिकांकडून महापालिका प्रशासनाचे आभार, सहायक आयुक्त चक्रपाणी अल्ले यांचा सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | अरविंद बनसोडे कुरनूरकर**

अंधेरी (पश्चिम) परिसरात रस्ते व पदपथांवरील अनधिकृत बांधकामे हटवून वाहतुकीस सुलभता आणल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाचे आभार मानले आहेत. यानिमित्ताने सहायक आयुक्त (के पश्चिम विभाग) श्री. चक्रपाणी अल्ले यांचा आज दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी त्यांच्या कार्यालयात नागरिकांकडून सत्कार करण्यात आला.

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई शहर व उपनगरांमध्ये अनधिकृत बांधकामांविरोधात सातत्याने कारवाई सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर उपायुक्त (परिमंडळ-३) श्री. विश्वास मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त श्री. चक्रपाणी अल्ले यांच्या नेतृत्वाखाली 'के पश्चिम' विभागामार्फत व्यापक मोहीम राबविण्यात आली.

गत काही दिवसांपासून वीरा देसाई मार्ग, कॅप्टन सामंत मार्ग, जे. पी. मार्ग तसेच अपना बाजार परिसर येथे रस्ते व पदपथांवरील अनधिकृत बांधकामे हटविण्याची कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे पादचारी व वाहनचालकांसाठी मोठ्या प्रमाणात वाहतुकीस सुलभता निर्माण झाली असून, वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होत आहे. रस्ते व पदपथ मोकळे झाल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य मिळाले आहे. ढाके वसाहत व परिसरातील नागरिक संघटना तसेच स्थानिक रहिवाशांनी या निर्णायक व प्रभावी कारवाईचे विशेष कौतुक केले आहे. सातत्याने सुरू असलेल्या या मोहिमेमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिसाद उमटत असल्याचे चित्र आहे. दरम्यान, भविष्यातही अनधिकृत बांधकामांविरोधात अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



# अतिवृष्टीचे अनुदान रखडले; शेतकऱ्याचा तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा

**वडवणी | प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील पिंपळटक्का येथील शेतकरी विश्वंभर विठ्ठलराव डोंगरे यांना अतिवृष्टी व रब्बी पिकासाठी मंजूर झालेले अनुदान अद्याप मिळाले नसल्याने त्यांनी तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

पिंपळटक्का शिवारातील गट नंबर २१ मध्ये विश्वंभर डोंगरे व त्यांच्या कुटुंबाची २ हेक्टर ८४ आर जमीन असून अतिवृष्टीमुळे त्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीपोटी शासनाने त्यांना अतिवृष्टी अनुदान रुपये १७,००० आणि रब्बी पिकासाठी रुपये २०,००० असे एकूण रुपये ३७,००० अनुदान मंजूर केले आहे.विशेष म्हणजे, तलाठी कार्यालयामार्फत सर्व कागदपत्रांची पूर्तता करून दि. २०/१०/२०२५ रोजी रितसर अर्ज, बॉण्ड व संमतीपत्र सादर करण्यात आले असून तलाठ्यांनी तहसील कार्यालय वडवणी येथे यादी क्रमांक २ मध्ये विश्वंभर डोंगरे यांच्या नावाने अनुदान हि पाठवले आहे. मात्र, असे असतानाही गेल्या अनेक महिन्यांपासून अनुदानाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा झालेली नाही.

या संदर्भात शेतकऱ्याने जिल्हाधिकारी व तहसिलदार,तालुका प्रशासनाकडे वारंवार लेखी तक्रारी अर्ज करूनही महसूल प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आहे. तहसील कार्यालयात संबंधित कर्मचाऱ्यांकडे विचारणा केल्यास तीन महिने लागतील, आता अनुदान मिळणार नाही अशी उडवा-उडवीची उत्तरे दिली जात असल्याचेही शेतकऱ्याचे म्हणणे आहे. पिंपळटक्का येथील भिकाजी विठ्ठलराव डोंगरे, बाळू विठ्ठलराव डोंगरे, सविता लाला कोरडे, गंगु नाना चव्हाण आदींची सामाईक जमीन असतानाही आवश्यक ती सर्व प्रक्रिया पूर्ण झालेली असताना अनुदान रोखले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित राहावे लागत आहे तरी या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून मंजूर झालेले अतिवृष्टी व रब्बी पिकाचे अनुदान त्वरित खात्यात जमा करावे, अन्यथा दि. २८ जानेवारीपासून तहसील कार्यालय वडवणी येथे बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा विश्वंभर डोंगरे यांनी दि. २३ जानेवारी रोजी तहसीलदारांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

# वझरगा येथे स्मशानभूमी उपलब्ध करून द्या;माणिक सूर्यवंशी यांचे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी





**दैनिक वादळ वार्ता**
**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यापासून अवघ्या दहा किलोमीटर अंतरावर असणारे वझरगा गाव येथे स्मशानभूमी नसल्याने येथे अनेक वर्षापासून समशान भूमीची मागणी होत आहे. त्याच अनुषंगाने भाजपचे पदवीधर देगलूर तालुकाध्यक्ष माणिक बालाजीराव सूर्यवंशी यांनी निवेदनाद्वारे उपजिल्हाधिकारी देगलूर, तहसीलदार देगलूर व गटविकास अधिकारी देगलूर यांना निवेदनाद्वारे तात्काळ समशानभूमी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे..

२१व्या शतकात मानव मृत्यूनंतर त्याच्यावर अंत्यविधी करण्यासाठी स्मशानभूमी सारखी अत्यावश्यक उपलब्धता नसणे ही फार मोठी शोकांतिका आहे. पूर्वीपासूनच मिळेल त्या ठिकाणी अंत्यविधी करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येत होती. मात्र आता वस्ती व लोकसंख्या वाढल्याने प्रत्येक समाजास हक्काची स्मशानभूमीची अत्यावश्यकता भासत आहे. आज घडीला पारंपारिक पण नोंद नसलेल्या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी सुविधा सुद्धा उपलब्ध नाहीत. पावसाळ्यात तर परिस्थिती अधिकच बिकट बनत आहे जेणेकरून केवळ स्मशानभूमी या जागेची उपलब्धता व त्यातील सुविधा न मिळाल्याने वझरगा येतील नागरिकांमध्ये कमालीची नाराजी पसरलेली दिसते वझरगा येथील गावातील लोकसंख्या जवळपास २००० इतकी मोठी आहे. मात्र एवढ्या मोठ्या गावात लोकसंख्या असताना सुद्धा स्मशानभूमी व त्यातील सुविधा उपलब्ध नसणे ही मोठी शोकांतिका आहे. असुविधेचे भांडार असलेल्या जागेमध्ये अंत्यविधी करणे ही मृत्यू नंतरही मानवी जीवनाचे विटंबना होत असल्याचे चित्र निर्माण होत आहे. त्यामुळे प्रशासनाने सदर निवेदनाची तात्काळ दखल घेऊन तात्काळ स्मशानभूमीची उपलब्धता व त्यातील सुविधा ज्यामध्ये आता उपलब्ध असलेल्या असलेली जागा समाजाच्या नावे लावण्याची प्रक्रिया पूर्ण करावी व दफन भूमी कडे जाण्यासाठी रस्ता, बसण्यासाठी जागा, व शेड,विजेचे कामांमध्ये दिवे, संरक्षण भिंत,पाणी, देखभाल व दुरुस्ती या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.अशा स्वरूपाचे निवेदन भारतीय जनता पार्टी पदवीधर देगलूर तालुकाध्यक्ष माणिक बालाजीराव सूर्यवंशी यांनी संबंधित विभागास दिलेली आहेत.

# कायदेविषयक व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर:शाप की वरदान

**दैनिक वादळ वार्ता**
**परभणी । प्रतिनिधी**




कायदेविषयक व्यवसायात कृत्रिम बुद्धिमत्ते (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) चा बऱ्यापैकी वापर केला जात आहे. तथापि हे शाप की वरदान हे अद्याप स्पष्ट झाले नसल्याने याविषयी अनेकांची मतं जाणून घेण्याचा प्रयत्न झाला.

परभणी येथील वकील संघाच्या वतीने आज शुक्रवार, दि.२३ जानेवारी २०२६ रोजी शाप की वरदान या विषयावर वाद विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परभणी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष तथा विधीज्ञ मा.श्री.साहेबराव अडकिने यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमास ज्येष्ठ विधीज्ञ मा.श्री.सर्जेराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. सदर स्पर्धेत एकूण २२ स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदवला होता. प्रत्येक स्पर्धकाला आपले विचार मांडण्यासाठी पाच मिनिटांचा वेळ देण्यात आला होता. संघाचे सचिव तथा विधीज्ञ श्री.बोबडे यांनी कार्यक्रमाचे अतिशय उत्कृष्ट असे नियोजन केले होते. आगामी २६ जानेवारी २०२६ रोजी आयोजित भव्य अशा अमृतमहोत्सवी प्रजासत्ताक सोहळ्यात उत्तेजनार्थ स्पर्धकांची नावे जाहीर करण्यात येणार असून परभणी जिल्हा न्यायालयातील प्रमुख न्यायाधीश श्रीमती उज्ज्वला नंदेश्वर मॅडम यांच्या शुभ हस्ते स्पर्धकांना पुरस्कार व प्रमाणपत्र प्रदान केले जातील असे संघाचे अध्यक्ष तथा विधीज्ञ साहेबराव अडकिने यांनी सांगितले. सदर कार्यक्रमास वकील संघातील सर्व महिला व पुरुष वकील विशेषतः ज्येष्ठ मान्यवर वकील सदस्यांनी भरभरुन साथ दिली. त्याशिवाय आपली उपस्थिती लावून कार्यक्रमाची जी शोभा वाढविली ती अवर्णनीय अशीच म्हणता येईल. संघाच्या वतीने अशा प्रकारचे नानाविध उपक्रम राबवून ते समस्त सदस्यांसाठी बौध्दिक चालना देणारे आणि व्यापक अशा ज्ञानाचे भांडार वाढीस लागून कायदेविषयक अशा मौलिक विचारांना वाव देणारे ठरले जावेत, असेच प्रयत्न संघातर्फे केले जातील परंतु त्यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचा मनोदय अध्यक्ष तथा विधीज्ञ अडकिने यांनी यानिमित्ताने व्यक्त केला आहे. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा वकील संघाचे सचिव ड.मदन बोबडे, उपाध्यक्ष ड.विनोद रसाळ, ड.संतोष जाधव, सहसचिव तथा ड.मृणाल देशमुख यांनी उत्कृष्टपणे काम केले. तर, परिक्षक म्हणून ड.सुजित देशमुख सर, ड.रफीउद्दीन काझी साहेब यांनी बारकाईने निरिक्षण केले.

## बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त गडचिरोली जिल्ह्यात शिवसैनिकांकडून उत्साहात अभिवादन व सजावट



**दैनिक वादळ वार्ता**
**नारायणपूर । प्रतिनिधी**

सिरोंचा: वंदनीय अखंड हिंदुस्थानचे हिंदूस्थानचे हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त गडचिरोली जिल्ह्यात विविध ठिकाणी उत्साहात सजावट करून अभिवादन करण्यात आले.महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते श्रीमान एकनाथजी शिंदे यांच्या प्रेरणेतून आणि विदर्भ संघटक प्रमुख किरण पंडाव यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख राकेश बेलसारे, शिवसेना सह संपर्क प्रमुख हेमंत जंबेवार, अहेरी विधानसभा क्षेत्राचे संदीप कोरेत, तालुकाप्रमुख विदर्भ शिवसेना तेलगू समाज प्रमुख गणेशभाऊ बोधणवार, शिवसेना संघटक युवा सेना तालुका प्रमुख शिवभक्त संघटना (सिरोंचा) प्रशांत भाऊ नस्कुरी यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिंदे सर, अमरेश सर, राहुल सर, निखिल सर, प्रवीण पेदी, संदीप नसानी, कार्तिक नसारठी, शेखर पोठलपेली, मधुकर तालंडी, गौतम कुमारी, श्रीकांत बोरला, व्यंकटेश अकेला यांसह सर्व शिवसैनिक आणि युवा सैनिकांनी मोलाचे सहकार्य केले. याप्रसंगी जय हिंद, जय महाराष्ट्र च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

# अभिवादन बाळासाहेबांना, जीवनदान रुग्णाला! गणेशभाऊ बोधनवार यांनी दाखवली माणुसकी;२० मिनिटांत केली रुग्णवाहिकेची व्यवस्था

**दैनिक वादळ वार्ता**
**सिरोंचा । प्रतिनिधी**







शिवसेना संस्थापक हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र उत्साहाचे वातावरण असताना, सिरोंचा येथे एका शिवसेना पदाधिकाऱ्याने आपल्या कृतीतून '८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण' हा बाळासाहेबांचा वारसा खऱ्या अर्थाने जपला आहे. शिवसेना तालुका प्रमुख गणेशभाऊ बोधनवार यांच्या तत्परतेमुळे एका गंभीर रुग्णाला वेळेवर उपचार मिळण्यास मदत झाली असून, त्यांच्या या कार्याचे तालुक्यात कौतुक होत आहे.

नेमकी घटना काय?

आज बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त सिरोंचा ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी गणेशभाऊ बोधनवार आणि त्यांचे सहकारी रुग्णालयात पोहोचले. फळवाटप करत असतानाच त्यांना करसपल्ली-नारायणपूर येथील एका रुग्णाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे समजले. डॉक्टरांनी त्या रुग्णाला तातडीने पुढील उपचारासाठी 'रेफर' केले होते, मात्र रुग्णालयात सरकारी रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने रुग्णाचे नातेवाईक हतबल झाले होते.

२० मिनिटांत मदतीचा हात.

रुग्णाच्या नातेवाईकांचा आक्रोश आणि परिस्थितीचे गांभीर्य ओळखून गणेशभाऊंनी फळवाटपाचा कार्यक्रम बाजूला ठेवून तातडीने सूत्रे हलवली. त्यांनी स्वतः पुढाकार घेत आपल्या संपर्कातील खासगी रुग्णवाहिकेची व्यवस्था केली. अवघ्या २० मिनिटांत रुग्णवाहिका रुग्णालयात दाखल झाली आणि त्या रुग्णाला पुढील उपचारासाठी रवाना करण्यात आले. बाळासाहेबांना खरी श्रद्धांजली ही केवळ हार अर्पण करून नव्हे, तर संकटात सापडलेल्या सामान्य माणसाची सेवा करूनच देता येते, अशी भावना यावेळी बोधनवार यांनी व्यक्त केली.

शिवसैनिकांची उपस्थिती:

यावेळी गणेशभाऊंसोबत शहर प्रमुख साई मार्गोनी, सुरेश लग्गावार, कौशिक भोगे, हरी अशोक, प्रशांत नुसकुरी, संदीप घंटावर, वेंकट कासारलावार, करण भोगे, विकास कासारलावार, सुजल कमलवार, सुजित मदारबोइना, कार्तिक निमाला व इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ठळक वैशिष्ट्ये:

जयंतीनिमित्त फळवाटप कार्यक्रमादरम्यान बजावले सेवाकर्तव्य.

सरकारी रुग्णवाहिका नसल्याने नातेवाईक होते हताश.खासगी रुग्णवाहिका बोलावून रुग्णाला दिले जीवनदान

## डॉ.श्री.जयद्रथ आखाडे अष्टपैलू अक्षरभूषण राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्काराने सन्मानित



**दैनिक वादळ वार्ता**
**हवेली । प्रतिनिधी**

अष्टपैलू संस्कृती कला अकादमी - मुंबई आणि अक्षरमंच मासिक वृत्तपत्र न्यायप्रभात यांचें संयुक्त विद्यमाने शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, सामाजिक,व धार्मिक क्षैत्रातील राज्य स्तरीय स्पर्धात्मक उपक्रमातून साहित्यिकांच्या लेखणीला बळ देण्यासाठी वर्षभर स्पर्धा आयोजित करण्यात येतात . त्या अंतर्गत विविध विषयांवर काव्य लेखन करणारे साहित्यिकांचा नुकताच श्रीक्षेत्र आळंदी येथे भव्य पुरस्कार सोहळा आयोजीत करण्यात आला होता.सदर स्पर्धात्मक उपक्रमातून सलग दोन वर्षे उत्कृष्ट व सर्वोत्कृष्ट काव्य लेखन केल्या बद्दल पुणे येथील साहित्यिक डॉ श्री जयद्रथ आखाडे यांना अष्टपैलू अक्षर भूषण राज्य स्तरीय गौरव पुरस्कार २०२५ जागतिक किर्तीचे जेष्ठ साहित्यिक,विचारवंत, प्रसिद्ध कलाकार डॉ. मधुसूदन घाणेकर आणि संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. श्री शिवाजी किसन खैरे सर यांचें शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थितीत सह संपादक व कोषाध्यक्ष हे.भ.प. सौ अनुसया खैरे मॅडम, नाशिक जिल्हा एकात्मिक बाल विकास सेवा योजना - महाराष्ट्र शासन प्रकल्पाचे ख.उ.ऊड अधिकारी व साहित्यिक श्री प्रताप पाटील साहेब, जिल्हा उच्च न्यायालय - संभाजी नगर चे ड. विनोद गोल्हार साहेब आणि संस्थेचे सर्व मान्यवर पदाधिकारी यांचे सह संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक,केरळ, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यातील साहित्यिक उपस्थित होते.

# उमेदच्या महिलांनी कमी व्याजदरात कर्ज उचल करुन गृह उद्योगी बनावे

## एकल महिला समावेशन मेळाव्यात विविध बँक व्यवस्थापकांचा सल्ला

**दैनिक वादळ वार्ता**
**आरमोरी । प्रतिनिधी**




उमेदच्या एकल महिलांनी प्रभाग महिला संघाने आपल्या नजीकच्या बँकेकडून विविध योजना अंतर्गत कमीत कमी व्याजदराने कर्जाची उचल करुन सुलभ हप्त्याने परत फेड करुन गृह उद्योगी बनावे, असे एकल महिला समावेशन मेळाव्यात विविध बँकेच्या व्यवस्थापकांच्या सल्ला मार्गदर्शनातून देण्यात आला.

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान माध्यमातून विशेष मोहीम तालुका अभियान व्यस्थापन कक्ष पंचायत समिती अंतर्गत आदर्श महिला प्रभाग संघ अरसोडा/ पळसगांव यांचे वतीने दि.२२ जानेवारी २०२६ ला मौजा पळसगांव येथे एकल महिला समावेश मेळावा आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्याच्या अध्यक्षा ग्रामसेविका किर्ती सडमाके पळसगांव तर प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी एम.एम.मोंगरकर आरमोरी, सामाजिक कार्यकर्त्या सोनुताई ठाकूर, पळसगांव आरोग्य उपकेंद्राच्या सी.एच.ओ.डॉ.हुमने मॅडम पळसगांव, पोलीस पाटील गिताताई घोडाम पळसगांव जि.प.शाळेच्या मुख्याध्यापिका रामटेके मॅडम पळसगांव, तालुका व्यवस्थापक बोबाटे, मोडक मॅडम,बोदेले सर,प्रभाग समन्वयक कोल्हे सर, निखिल गजभिये सर तर मार्गदर्शनामध्ये प्रामुख्याने बॅंक व्यवस्थापक निशा कोकोडे बर्डी आरमोरी, बँक व्यवस्थापक पद्माकर शेंबे आरमोरी, ग्रामीण बँकचे व्यवस्थापक पियुष सातार्डे इत्यादी होते.

हा मेळावा यशस्वी करण्यासाठी एकल महिला प्रभाग संघाच्या अरसोडा/ पळसगांव महिलांनी परिश्रम घेतले.

# लक्ष्मी मुंडे नर्सिंगसाठी व स्कूलसाठी आम्ही मदत करु-अक्षयभैय्या मुंदडा

## लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कुलचे वार्षिक स्नेहसंमेल उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कुलचे २५-२६ या शैक्षणिक वर्षाचे वार्षिक स्नेहसमेंलन शुक्रवारी रोजी सकाळ आणि संध्याकाळ अशा दोन सत्रात प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत हे वार्षिक स्नेहसमेंलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.सांस्कृतीक कार्यक्रमात विद्यार्थी आणि विद्यार्थिंनीनी आपल्या कलेतून उपस्थित मान्यवरांची मने जिंकल्याने नर्सिंगच्या या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वांनी कौतुक केले. केज शहरापासुन जवळच असलेल्या लक्ष्मी नर्सिंग स्कुलचे २५-२६ चे वार्षिक स्नेह स्मेंलन शुक्रवार दि.२३ जानेवारी रोजी दोन सत्रात संपन्न झाले. सकाळी मान्यवरांच्या हस्ते स्नेहसमेंलनाचे उध्दघाटन करुन या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आले.या कार्यक्रमाठी केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सिताताताई बनसोड,जनविकासचे अध्यक्ष हारुणभाई इनामदार, केज उपजिल्हारुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे,डॉ.योगीनी जायभाए मॅडम,लॅबचे नागरगोजे,विठ्ठल जाधवर,दिनकर चाटे,या सर्व पाहुणे मंडळीचे स्वागत करण्यात आले. या सर्व उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावळी नर्सिंगच्या सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या कर्तव्याची शपथ घेतली. दुस-या सत्रात शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता सांस्कृतीक कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख






मार्गदर्शक म्हणून भाजपाचे युवा नेते अक्षय भैय्या मुंदडा हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष रमाकांत (बापू)हे होते तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून केज कृषी उत्पन्न बाजार समीतीचे सभापती मा.अंकुशराव इंगळे, महाराष्ट्र राज्याचे भाजपा प्रवक्ते मा.रामभाऊ कुलकर्णी, ॲड.शरद इंगळे,ऊसतोड मजूर संघटनेंचे अध्यक्ष कृष्णा तीडके, सेवानिवृत्त मुख्याद्यापक विठ्ठलराव जाधवर,भाजपाचे दिनकर चाटे,संस्थेंच्या सचिव उषाताई मुंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रस्ताविक देवगांव सेवा सोसायटीचे चेअरमण मधुर भैय्या मुंडे यांनी केले.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अक्षय मुंदडा म्हणाले की रमाकांत बापूनी आतापर्यंत राजकीय क्षेत्रासह पेट्रोल पंप,क्रेशरसह शेतीमध्ये प्रगती केल्याने यशस्वी झाले. आता शैक्षणिक क्षेत्रात सहभाग घेऊन लक्ष्मी नर्सिंग स्कूल सुरु केल्या बद्दल मी बांपूचे अभिनंदन करतो.यापूढे मधुरने देखील या शैक्षणिक क्षेत्राकडे लक्ष दिले पाहीजे,या नर्सिंग स्कूलमुळे केज तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांच्या जिवनात प्रगती होणार त्यासाठी सर्व नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी चांगला आभ्यास करुन प्रॅक्टीस करावी.पालकांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे लक्ष दिल पाहीजे.विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीच सोन केल पाहीजे.आपल्या शैक्षणिक संस्थेला शिस्त लावली पाहीजे त्यामुळे शिक्षणाची प्रगती होते. लक्ष्मी नर्सिंगसाठी व स्कूलसाठी आम्ही लागेल ती मदत करण्यासाठी कटीबध्द आहोत. असे अक्षयभैय्या यावेळी म्हणाले. यावेळी नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतीक कला सादर करताना आँखे खुली हो य बंद प्यार कैसा होता है, ढफलीवाले तेरी ऑखीयो का का काजल,लिखे खत तुझे,बांगो बांगो, ह्रदयी वसंत फुलताना,प्रेमात रंग यावे,राणी माझ्या मळ्यामध्ये घुसशिल का,चंद्रा,गोरेगोरे मुखडे पे काला काला चष्मा,मला म्हणत्यात पूण्याची मैना,बैलजोडा पाटलांचा बैलगाडा,शांताबाय, डॉलबी बोलवा डिजेला,गुलाबी साडी,ग साजणे आली ठुमकत हिरव्या राणी,आस वाजवा की,झाल झाल झिंगाट,पाखरा आझाद केल तुला,मिरची झापूक झूपूक वाजत राहतय गं,पिचली माझी बांगडी गं, तुमचा कट्टर मी मावळा, वाजले की बारा,कोंबडी पळाली असे मराठी हिंदी गितावर नृत्य करुन विद्यार्थी आणि विद्यार्थिंनीनी आपल्या कलेतून उपस्थित मान्यवरांची मने जिंकली.यामुळे नर्सिंगच्या या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वांनी कौतुक केले.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य रवि पवार,लखेरासर, गायके मॅडम,गालफाडे मॅडम, सोनवणेताई ताई यांनी परिश्रम घेऊन हा कार्यक्रम यशस्वी केला.या कार्यक्रमासाठी आलेल्या सर्वांचे आभार संस्थेंच्या सचिव उषाताई मुंडे यांनी मानले.

# नालंदा विद्यालयात आनंद नगरी मेळावा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

नालंदा विद्यालय केज या शाळेत विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, आणि त्यांना व्यवहारिक गणिताचे धडे मिळावेत या उद्देशाने आनंदनगरी ( बाल आनंद मेळावा) सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी लावलेल्या विविध खाद्यपदार्थांच्या दुकानांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

आनंद नगरी या कार्यक्रमाचे उद्घाटन नालंदा विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री नंदकुमार मस्के सर यांनी फीत कापून केले. फित कापुन उद्घाटनाच्या वेळी शाळेतील शिक्षक श्री.गरड सर कांबळे.सर, कदम सर, वाघमारे सर, बडे सर ,श्रीमती गुरमे मॅडम,पालक व शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक नंदकुमार मस्के सर यांनी सांगितले की, केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान मिळावे यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच या मेळाव्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नफा तोटा, खरेदी विक्री ,आणि बचतीचे महत्त्व समजून येते. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत अशा कार्यक्रमामुळे मुलांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळते असे मत व्यक्त केले. शाळेच्या मैदानावर



विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले पदार्थ, घरगुती खाद्यपदार्थ, यांची छोटी छोटी दुकाने थाटात मांडली होती. त्या दुकानात भेळ, पावभाजी, पाणीपुरी, पोहे, सॅंडविच, कांदा भजी, कांदा पकोडे, पुलाव, फ्रेंच फ्राय, गोबी मंचुरियन, अशा विविध दुकानावर विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. विशेष म्हणजे चिल्लर पैशांचा हिशोब आणि ग्राहकांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाखाणण्यासारखा होता.या आनंदनगरी मेळाव्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आनंदनगरी मेळाव्यात कुमारी सुहाना शेख, शेख अफसाना, फेक आलिया, शेख जरिया, शेख रेश्मा, सिरसट रूपाली,चि.मस्के अंकुर, आलाट विवेक,केकाण सोहम,गाडे हर्षद, जाधव कृष्णा, गवळी अनिकेत इत्यादी विद्यार्थ्यांनी थाटात दुकाने मांडली.हा आनंद नगरी सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक विद्यार्थी आणि पालकांनी परिश्रम घेतले . मेळाव्याच्या समाप्तीच्या वेळी सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री कांबळे सर यांनी केले. व शेवटी कांबळे सर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

# लोकहित युवा एकता संघटनेच्या वतीने गरीब गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**पुणे । शंकर जोग**

लोकहित युवा एकता संघटनेच्या वतीने व कनव वसंतराव चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त लोहिया नगर परिसरातील गरीब गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, स्कूल बॅग आदी शैक्षणिक साहित्य वितरित करण्यात आले. शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला हातभार लावणे हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता.यावेळी साजिद शेख संस्थापक अध्यक्ष लोकहित युवा एकता संघटनाअहमद काझी, अविनाश अवघडे, कणव वसंतराव चव्हाण युवा मंचचे अध्यक्ष कुणाल करोते, सिद्धांत सारवान, सिद्धार्थ भालेराव , सतीश आल्हाट, निखिल बत्तेलू , गोपी कसोटे, अक्षय वाघेला, अभिजित कसबे आदि उपस्थित होते.

# भीमाशंकर मामा कापसे यांचा वाढदिवस माळाकोळी सर्कल मध्ये विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा



दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात सदा अग्रेसर असणारे लोहा तालुक्यातील मौजे रिसनगावचे भूमीपुत्र आझाद ग्रुपचे संस्थापक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा काँग्रेसचे युवा नेते भीमाशंकर मामा कापसे यांचा वाढदिवस माळाकोळी सर्कल मध्ये विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी प्रथम दक्षीण भारतात प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र माळेगाव यात्रा येथील श्री खंडोबा मंदिरात महाआरती करण्यात आली.त्यानंतर माळाकोळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना फळे वाटपकरण्यात आले. त्यानंतर पोलेवाडी येथील जि.प. प्रा. शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी आझाद ग्रुपचे प्रदेश संघटक प्रसाद पोले भारत मस्के, आत्माराम मुस्तापुरे, विजय मस्के, गजानन जाधव, शंकर चव्हाण,पत्रकार विलास सावळे, विनोद महाबळे, अंबादास पाटील पवार, माधव बावरे,राज गिते,ऋतिक जोंधळे आदी उपस्थित होते.

पोलेवाडी येथील जि.प. प्रा.शाळेतील विद्यार्थ्यांना भीमाशंकर मामा कापसे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसु फुलले व त्यांनी भीमाशंकर मामा कापसे हॅपी बर्थडे डू यू गीत गाऊन भीमाशंकर मामा कापसे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छाचा वर्षाव केला.

# शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांना जयंतीनिमित उरण शहर शाखेतर्फे अभिवादन





दैनिक वादळ वार्ता

**उरण । प्रतिनिधी**

हिंदुह्रदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या १०० व्या जयंतीनिमित शुक्रवार दिनाकं २३ जानेवारी २०२६ रोजी रायगड जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये उरण शहर शाखेतर्फे भावपूर्ण आदरांजली वाहून अभिवादन करण्यात आले, हे वर्षे हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जन्म शताब्दी वर्ष असल्यामुळे उरण शहरात शिवसेना शहर शाखेतर्फे विविध सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रातील कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते यावेळी साहेबांच्या तमाम शिवसैनिकांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या आठवणी जागवल्या.या वेळी शहरप्रमुख विनोद म्हात्रे, संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, शहर संघटक दिलीप रहाळकर, माजी उपनगराध्यक्ष परमानंद करंगुटकर, माजी विभागप्रमुख सूर्यकांत दरणे, महिला आघाडीच्या शहर संपर्क संघटिका व नगरसेविक श्रीमती वंदना पवार, शहर संघटिका मेघा मेस्त्री, शहर संघटिका विना तलरेजा, उपशहर संघटिका माधुरी चव्हाण, विभाग संघटिका रूपा सिंग, शाखा संघटिका लता राठोड, अल्पसंख्यांक सेलच्या शहर अध्यक्ष शादाब शेख, महिला अध्यक्षा मुमताज भाटकर, उपाध्यक्ष सायरा खान, सलीमा शेख, युवती सेनेच्या कु यशस्वी म्हात्रे,पत्रकार संघटनेचे अध्यक्ष घनश्याम कडू, माजी शहर संघटक महेश वर्तक, शाखाप्रमुख मिलिंद भोईर, इस्माईल शेख, अनिल पाटील, कमलाकर पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते रमाकांत म्हात्रे, अप्पा पठारे, मेहता, उमेश गीध, शिवा म्हात्रे, ग्राहक संरक्षण कक्षाचे जिल्हा चिटणीस ओमकार घरत, तालुका संघटक कुणाल पाटील, संदेश पाटील, अभिषेक भोईर, उपशाखाप्रमुख फतेह खान, उपशहर अधिकारी सर्वेश गवस, सिद्धेश म्हात्रे, सर्व आजी-माजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, अंगीकृत संघटनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठया उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077